कापुरबावडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thanc.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 310 /२०२६ दि. 99 /०२/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कापूरबावडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **दिनांक १५/०२/२०२६ ते दिनांक १९/०२/२०२६ पावेतो " महाशिवरात्री "** निमित्त श्री. नंदीबाबा मित्र मंडळातर्फे महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यात येणार आहे. नंदीबाबा मंदिरामध्ये दर्शनाकरिता येणारे भाविकांची गर्दी होत असते. त्यामुळे सदर परिसरात वाहतुक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर मार्गावरील वाहतुक ही पर्यायी मार्गाने वळवावी लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – **१)** माजीवडा मानपाडा प्रभाग समिती समोरून कोलशेतकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **माजीवडा मानपाडा प्रभाग समिती समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – **अ)** सदरचे मार्गावरुन जाणारे सर्व प्रकारची वाहने पुढे जावुन कापुरबावडी सर्कल पासुन उजवीकडे वळण घेवुन तत्वज्ञान विद्यापीठ मार्गे ब्रम्हांड अथवा आर मॉल मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) सदरचे मार्गावरुन जाणारे सर्व प्रकारची वाहने ही सरळ पुढे जावुन बाळुकम नाका मार्गे दादलानीकडे जाणारे चौकातुन डावीकडे वळण घेवुन राम मारुती रोडने अथवा दोस्ती कौटी गेट मधुन अथवा पुढे जावुन पाईप लाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **२)** कोलशेत कडुन कापुरबावडी सर्कल तसेच माजीवाडा मानपाडा प्रभाग समितीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ढोकाळी सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरचे मार्गावरून जाणारे सर्व प्रकारची वाहने ही उजवीकडे वळण घेवून, मनोरमानगर मार्गे अथवा लोढा अमाराकडुन लोढा बिझनेस डिस्ट्रीक समोरून ब्रम्हांड मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **३)** घोडबंदर–ठाणे मुख्य वाहिनीवरून नळपाडा सिग्नल येथून डावीकडे वळण घेवून डी मार्ट समोरून कोलशेतकडे जाणारे सर्व प्रकारचे वाहनांना **आर मॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरचे मार्गावरून जाणारे सर्व प्रकारची वाहने ही आर मॉल येथुन डावीकडे वळण घेवुन मनोरमानगर येथून पुढे सरळ जावून ढोकाळी सिग्नल येथुन डावीकडे वळण घेवून, इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **४)** घोडबंदर–ठाणे वाहिनी आर मॉल सर्व्हिस रोडने सरळ येवून हॉटेल विहंग इन येथून डावीकडे वळण घेवून पुढे सरळ येवून जोधपूर स्विट्स येथून डावीकडे वळण घेवून कोलशेतकडे जाणारे सर्व प्रकारचे वाहनांना **आर मॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरचे मार्गावरून जाणारे सर्व प्रकारची वाहने ही आर मॉल येथुन डावीकडे वळण घेवुन मनोरमानगर येथून पुढे सरळ जावून ढोकाळी सिग्नल येथुन डावीकडे वळण घेवून, इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दि. १५/०२/२०२६ रोजी पासुन ते दि. १९/०२/२०२६ रोजी १७:०० ते रात्रौ २२:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापुरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.